1/0

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन गेवराई ता.गेवराई,जि.बीड. सत्यमेव जयते

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** गेवराई

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0375 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**16/06/2025 20:56

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 06/06/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/06/2025

**Time From (वेळेपासून):** 15:01 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/06/2025 **Time (वेळ):** 20:46 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 035

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/06/2025 20:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय गेवराई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** तुळशीदास भानुदास कातकडे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1968
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण **(राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस,** पॅन कार्ड **)**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राकोल्हेर, पोस्ट बाग पिंपळगाव,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राकोल्हेर, पोस्ट बाग पिंपळगाव,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8308439920

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (**माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता**):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विलास भूमा चव्हाण | | | 1. पंचायत समिती कार्यालय, गेवराई,,गेवराई,बीड,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (**तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे**):**

9. **Particulars of properties of interest (**संबंधीत मालमत्तेचा तपशील**):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

ला.प्र.वि.कार्यालय, बीड

दिनांक 16/06/2025

मी तुळशीदास भानुदास कातकडे, वय-57 वर्ष, व्यवसाय-शेती, रा.कोल्हेर, पोस्ट बाग पिंपळगाव ता.गेवराई जि.बीड मो.क्र.8308439920 (Airtel) आधार कार्ड क्र.767148230313

मी दि.06/06/2025 रोजी श्री.युनुस शेख, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचेकडे विश्वेश्वर मंदीर, बीड गेवराई बायपास रोड गेवराई येथे सुरक्षीत ठिकाणी पंचासमक्ष तक्रार दिली की, "मौजे कोल्हेर ता.गेवराई जि.बीड येथे स्वच्छ भारत अभियान (मिशन) ग्रामीण घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापण सन-2020-2021 अन्वये काम मंजुर होऊन त्याचा तांत्रिक मान्यता क्र.96 दि.04/03/2022 असा असुन तांत्रीक मान्यता आदेश जा.क्र.499 दि.04/03/2022 अन्वये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी काढला. त्यानंतर दि.25/03/2022 रोजी सदर कामास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर दि.03/02/2025 रोजी कार्यारंभ आदेश होऊन कंत्राटदार श्री.तिर्थराज गवारे यांनी सदर काम पुर्ण केले. सदर योजने अंतर्गत मौजे कोल्हेर येथील कामकाज पुर्ण झाल्याने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामाचा स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा 02 अंतर्गत 70 टक्के हिस्याची रक्कम 482324/- रुपयाचे अंतिम बिल मिळणे बाबतची फाईल घेवुन मी दि.05/06/2025 रोजी दुपारी बारा ते साडेबारा वाजण्याचे सुमारास पंचायत समिती कार्यालय, गेवराई येथील स्वच्छ भारत मिशन विभागाचे कार्यालय (उमेद कक्ष) मध्ये जाऊन श्री.चव्हाण, गट समन्वयक यांची भेट घेवुन सदरचे अंतिम बील मिळणे बाबतची फाईल त्यांचेकडे दिली असता, श्री.चव्हाण यांनी मला अंतिम बिलामध्ये टिपणी टाकुन सही करण्यासाठी पाच ते दहा हजार रुपये खर्च येईल असे म्हणुन लाचेची मागणी करीत आहेत. " वगैरे मजकुराची तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीवरुन दि.06/06/2025 रोजी पोनि/शेख यांनी श्री.चव्हाण साहेब हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला व पंच क्र.1 श्री.आकुसकर यांना श्री.चव्हाण यांचेकडे पंचायत समिती कार्यालय, गेवराई येथील स्वच्छ भारत मिशन ग्रामीण या विभागाचे कार्यालय (उमेद कक्ष) येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/शेख यांनी मला व पंचांना एकंदरीत सापळा कारवाई कशी असते ? व सापळा कारवाईचे आयोजन कसे केले जाते ? याबाबत माहिती दिली. पोनि/शेख यांनी मला व पंचांना सापळा कारवाईमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. तसेच मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. पोनि/शेख यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन स्वत:, माझे व पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पोनि/शेख यांचे सुचनेवरुन पोलीस अंमलदार श्री.गवळी यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस दोरीने सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र.1 श्री.आकुसकर यांना माझेकडील मोटार सायकलने श्री.चव्हाण यांचेकडे पंचायत समिती कार्यालय, गेवराई येथील स्वच्छ भारत मिशन ग्रामीण या विभागाचे कार्यालयाकडे (उमेद कक्ष) रवाना केले. त्यावरुन मी व पंच क्र.1 श्री.आकुसकर असे माझेकडील मोटार सायकलने पंचायत समिती कार्यालय, गेवराई येथील स्वच्छ भारत मिशन ग्रामीण या विभागाचे कार्यालय (उमेद कक्ष) मध्ये गेलोत. त्याठिकाणी माझी व श्री.चव्हाण साहेब यांची भेट झाली. भेटी दरम्यान आमचेत अंतिम बिला संदर्भाने चर्चा झाली. श्री.चव्हाण साहेबांनी अंतिम बिलाचे फाईलमध्ये बॉन्ड, श्री. गवारे यांचे नावाचे टेंडर, त्रयस्थ संस्थेचा तपासणी अहवाल अशा त्रुटया काढुन माझ्याकडे अंतिम बिलाची फाईल परत करुन मला 5000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम सोमवार दि.09/06/2025 रोजी स्वत: स्विकारण्याचे मान्य केले. पोनि/शेख यांनी सापळा कारवाई स्थगित करुन दि.09/06/2025 रोजी श्री.चव्हाण

यांचेविरुध्द लाचेचा सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्याबाबत दि.06/06/2025 रोजी सविस्तर लाचमागणी पडताळणी पंचनामा केला आहे.
मी दि.09/06/2025 रोजी पोनि/शेख यांना फोन करुन माझे गावातील इसम मयत झाला असल्याने श्री.चव्हाण यांचेविरुध्दची सापळा कारवाई दि.10/06/2025 रोजी करण्याची विनंती केली होती. त्यावरुन दि. 10/06/2025 रोजी पोनि/शेख हे पंच व सापळा पथकासह विश्वेश्वर मंदिर बीड गेवराई बायपास रोड, गेवराई येथे सुरक्षीत ठिकाणी हजर आले. पोनि/शेख यांनी शासकीय वाहनात मला व पंचांना अँथ्रासिन पावडर व अल्ट्रा व्हॉयलेट लॅम्पचे उपयोग व गुणधर्म सांगुन प्रात्यक्षीक करुन दाखवुन मी हजर केलेल्या 500/-रु. दराच्या 10 नोटा असे एकुण 5000/-रु. लाच रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या पँन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. त्यानंतर मला, पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देऊन सापळा पथकास दिसेल अशा ठिकाणी येवुन " डोक्यास गमजा बांधावा" असा इशारा नेमुन दिला. तसेच श्री.चव्हाण यांनी काढलेल्या त्रुटींची पुर्तता केलेले कागदपत्र ज्यामध्ये श्री.गवारे यांचे टेंडर, त्रयस्थ संस्था तपासणी अहवाल व बॉन्ड च्या झेरॉक्स प्रती पोनि/शेख यांचेकडे दिल्या. तसा दिनांक 10/06/2025 रोजी सापळापुर्व कारवाईचा पंचनामा केला आहे.
सापळापुर्व कारवाईचा पंचनामा झाल्यानंतर पोनि/शेख यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन स्वत:, माझे व पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. यांनी पोनि/शेख यांचे सुचनेवरुन पोलीस अंमलदार श्री.गवळी यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस दोरीने सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र.1 श्री.आकुसकर यांना माझेकडील मोटार सायकलने अंतिम बिलाचे फाईलसह लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 5000/- रुपये लाच रक्कम श्री.चव्हाण यांना देण्यासाठी पंचायत समिती कार्यालय गेवराई येथील स्वच्छ भारत मिशन ग्रामीणचे कार्यालयाकडे (उमेद कक्ष) येथे पाठवुन श्री.चव्हाण यांचेविरुध्द लाचेच्या सापळ्याचे आयोजन केले असता, माझी व श्री.चव्हाण साहेब यांची भेट झाली. भेटी दरम्यान आमचेत अंतिम बिला संदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान मी अंतीम बिलाची फाईल श्री.चव्हाण यांचेकडे देऊन श्री. चव्हाण यांना कॅश आणली, कॅश देवु का, तुम्ही म्हणल्या प्रमाणे केलंय असे म्हणालो असता, श्री.चव्हाण यांनी मला तयार करुन ठेवतो, तुम्ही तासाभराने चक्कर मारा, मी तयार करुन तुम्हाला फोन करतो, असे म्हणुन श्री.चव्हाण यांनी माझा मोबाईल क्रमांक घेतला. त्यानंतर मी श्री.चव्हाण यांना किती टाईम लागेल अशी विचारणा केली त्यावेळी श्री.चव्हाण यांनी मला "तास दिड तास लागन, सगळं तयार करावं लागतं, टिपण्या तयार करायच्यात" असे सांगीतले. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.आकुसकर सुरक्षीत ठिकाणी परत आलो. त्यानंतर श्री.चव्हाण यांनी त्यांचा मो.क्र.9403902479 वरुन माझा मो.क्र.8308439920 वर मिस्ड कॉल आल्याने मी त्यांना कॉल केला असता, त्यांनी मला "घेऊन जा, झालय ते "असे सांगीतले. त्यावरुन पोनि/शेख यांचे सुचनेवरुन पोलीस अंमलदार श्री.गवळी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र.1 श्री.अकुसकर यांना श्री.चव्हाण यांचेकडे पंचायत समिती कार्यालय, गेवराई येथील स्वच्छ भारत मिशन ग्रामीण कार्यालय (उमेद कक्ष) येथे पाठवुन पुन्हा श्री.चव्हाण यांचे विरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन केले असता, त्याठिकाणी माझी व श्री.चव्हाण यांची भेट झाली. भेटी दरम्यान श्री.चव्हाण यांनी मला "तुमचं काम करुन दिलय, काही अडचण नाही आता " असे म्हणुन एपीओ, उपअभियंता धाबेकर, लेखाधिकारी, सहायक गटविकास अधिकारी बिडवे, सरपंच, ग्रामसेवक आटोळे यांच्या सह्या घेण्यास सांगीतले. त्यावर मी श्री.चव्हाण यांना पैसे आणलेत त्याचं काय करायचं तुम्ही म्हणल्याप्रमाणे, परत यावा लागत नाही ना असे म्हणालो असता, श्री.चव्हाण यांनी मला त्यांचे उजवे हाताचा इशारा करुन "परत येईची गरज नाही, घेऊन जा" असे म्हणुन अंतीम बिलाची फाईल व चव्हाण यांनी टिपणी टाकुन सही केलेले कागदपत्र माझ्याकडे दिले व माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारली नाही. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सुरक्षीत ठिकाणी परत आल्यानंतर पोनि/शेख यांना मी कळवले की, श्री.चव्हाण यांनी त्यांचेकडील अंतीम बिलाचे काम करुन दिले असुन परत यायची गरज नाही असे सांगीतले असुन श्री.चव्हाण यांना माझा अथवा पंचाविषयी काहीतरी संशय आल्याने श्री.चव्हाण यांनी माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारली नाही तसेच माझे त्यांचेकडील काम झाल्याने ते यापुढे देखील माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत अशी माझी खात्री झाली असुन आज पर्यंत झालेल्या कारवाईवर त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करावी अशी विनंती केली. पोनि/शेख यांनी माझ्याकडुन श्री.चव्हाण यांनी सही करुन दिलेल्या टिपणीचे मुळ कागदपत्र स्वत:चे ताब्यात घेतले. त्याबाबत दि.10/06/2025 रोजी पोनि/शेख यांनी सविस्तर सापळा कारवाई स्थगिती पंचनामा केला आहे.
दिनांक 06/06/2025 रोजी 15.01 ते 16.10 वा. चे दरम्यान पंचायत समिती कार्याल, गेवराई येथील स्वच्छ भारत मिशनचे विभागाचे (उमेद कक्ष) मध्ये श्री.चव्हाण, गट समन्वयक यांनी माझ्याकडे मौजे कोल्हेर येथील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन कामाचा स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा 02 अंतर्गत 70 टक्के हिस्याची रक्कम 482324/- रुपयाचे अंतिम बिलावर टिपणी टाकुन सही करण्यासाठी 5000/-रु. लाचेची मागणी करुन

लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य करुन लाच रक्कम मिळवण्याचा प्रयत्न केला म्हणुन माझी श्री.विलास भूमा चव्हाण, वय-43 वर्ष, व्यवसाय-नौकरी, तालुका समन्वयक, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा क्र.2, पंचायत समिती कार्यालय, गेवराई, जि.बीड रा.बाबी तांडा, ता.वडवणी जि.बीड ह.मु.काळकुटे यांचे घरी पाण्याच्या टाकीजवळ, भक्ती कन्स्ट्रक्शन, बीड यांचे विरुध्द फिर्याद आहे.
हि फिर्याद दिली माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.
समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

PRAVINKUMAR YUVRAJ BANGAR(I (Inspector)) / PI **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली**.)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** PRAVINKUMAR YUVF

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI

पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे.गेवराई.